तसेच सभासदत्वाचा राजीनामा देतांना सभासद होऊन किमान १ वर्षाचा कालावधी झालेला असावा व त्यासाठीची सुचना किमान १ महिना अगोदर देणे आवश्यक आहे. कोणत्याही सहकारी वर्षात अशा तऱ्हेने परत करण्यात आलेले भांडवल त्यापूर्वीच्या दि.३१ मार्च रोजी असलेल्या वसूल भाग भांडवलाचे १०% पेक्षा जास्त असणार नाही. अशा परत करण्यात येणाऱ्या भाग भांडवलाची किंमत त्या अगोदरच्या वर्षाच्या मुल्यांकनानुसार येणारी किंमत किंवा दर्शनी किंमत यापैकी कमी असेल ती राहिल.

२) ज्या सभासदांनी राजीनामा देऊन भाग भांडवल काढून घेतले आहे. अशा सभासदांना राजीनामा दिल्यापासून किमान एक वर्षापर्यंत परत बँकेचे सभासदत्व घेण्यास परवानगी दिली जाणार नाही.

**२३) सभासदाचे निष्कासन करणे (Expulsion of member) :**

१) बँकेच्या कोणत्याही सभासदाचे निष्कासन हे कायदा, नियम व त्यासाठीच्या सर्वसाधारण सभेतील उपस्थित व मतदान करणाऱ्या सभासदांमधील ३/४ सभासदांच्या बहुमताने यासंबधीत पारीत झालेल्या ठरावानुसार राहील. कोणत्याही सभासदाच्या बँकेस अपायकारक ठरणाऱ्या व हानी पोहचवू शकणाऱ्या कृत्यामुळे बँकेच्या कामकाजात अडचणी येत असतील तर अशा सभासदांचे निष्कासन बँक करेल.

२) निष्कासन झालेल्या सभासदास त्याची बाजू कायदा व नियम यानुसार मा.निबंधक यांचेपुढे मांडता येईल व मा.निबंधकाचे मंजूरीनंतरच संबंधीत सभासदाचे सभासदत्व संपुष्टात येईल.

३) निष्कासित झालेल्या कोणत्याही सभासदास निष्कासन झाल्यापासून एक वर्षाच्या कालावधीपर्यंत पुनश्च सभासदत्व दिले जाणार नाही.

**२४) सभासदत्व संपुष्टात येणे :**

पुढील बाबतीत सभासदत्व संपुष्टात येईल.

अ) व्यक्तीगत सभासदाचा मृत्यू झाल्यास किंवा भागीदारी संस्था, कंपनी व इतरांच्याबाबतीत विसर्जन अथवा दिवाळखोरी झाल्यास.

ब) नादारी जाहीर झाल्याने अथवा कायदेशीर तरतूदीने सभासद राहण्यास लायक न ठरल्यास.

क) संस्थेच्या पूर्वपरवानगीने सर्व भागांचे दुसऱ्यांचे नावांवर हस्तांतरण केल्यास, (सदरनियम हा ज्या संस्थाचे नक्तमूल्य ऊणे नाही अशाच संस्थांना लागू होईल.)

ड) राजीनामा दिल्याने किंवा सभासदत्व कमी करण्याची मागणी मान्य झाल्यास.

इ) सभासदांचे कायदा व नियमानुसार निष्कासन झाल्यास, अशा निष्कासनामुळे भागांची रक्कम जप्त करता येवू शकेल.